POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-५७ ● मुंबई, सोमवार,२९ सप्टेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA





# मराठवाड्यात 'अश्रूंचा महापूर'

## फाटलं आभाळ, अतिवृष्टीने घायाळ; दुष्काळग्रस्त'



मराठवाड्यात आभाळ फाटलं,
पिकं पाण्याखाली, नागरिकांच्या घरात पाणी



### जनावरांचे नुकसान

**अतिवृष्टीत एकूण 213 जनावरे मृत्यूमुखी पडली आहेत. यामध्ये धाराशिवमध्ये 81, जालना (खं'ल्लं) जिल्ह्यात 40 जनावरे दगावली. दुधाळ जनावरांपैकी 98 मोठी आणि 86 लहान जनावरे, तर ओढकाम करणारी 25 मोठी आणि 7 लहान जनावरे दगावली आहेत.**

### गोदावरीला महापूर, नांदेड जलमय



दक्षिणेची गंगा आणि भारतातील दुसरी सर्वात लांब नदी असलेल्या गोदावरी नदीला सध्या महापूर आला आहे. नाशिकच्या त्र्यंबकेश्वरमधून या नदीचा उगम होतो. पुढे ही नदी छत्रपती संभाजीगर आणि नांदेड जिल्ह्यातून तेलंगणात जाते.या नदीचं उगमस्थान असलेल्या नाशिक जिल्ह्यात दरवर्षी जोरदार पाऊस होतो. त्याच पाण्यामुळे संभाजीनगर जिल्ह्यातील जायकवाडी धरणात पाणीसाठा जमा होतो. मात्र, सध्या राज्यात सर्वदूर पाऊस होत आहे. त्यातच नाशिकमध्ये झालेल्या पावसाने गोदावरीला पूर आला आहे. पुढे संभाजीनगरमध्येही पाऊस सुरू झाल्यानं गोदावरीच्या पाण्यात मोठी वाढ झाली असून जायकवाडी पाण्याची आवक वाढली आहे. त्यामुळे जायकवाडी धरणाचे 27दरवाजे उघडण्यात आलेत. पुढे नांदेड जिल्ह्यातही पाऊस सुरू असल्यानं तिथंही गोदावरी नदी दुधडी भरून वाहत असून नदीकाठच्या गावांमधील शेतांमध्ये पाणी साचलं आहे.छत्रपती संभाजीनगरच्या जायकवाडी धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. जायकवाडी धरणातून सध्या 1 लाख 98 हजार क्युसेक वेगाने विसर्ग सुरू आहे. जायकवाडी धरणाच्या 18 नियमित आणि 9 आपत्कालीन दरवाजातून विसर्ग सुरू असून गोदावरी नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.




**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

गेल्या काही तासांपासून मराठवाड्याच्या काही भागांमध्ये सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. नांदेडच्या मुखेड तालुक्यात रविवारी रात्री ढगफुटीसदृश पाऊस (ल्रींं५८ फ्रंल्ल) झाल्याने सहा गावं पाण्याखाली गेली आहेत. यापैकी दोन गावांमध्ये तब्बल 80 नागरिक अडकून पडले आहेत. पाण्याची पातळी वाढल्याने आता या नागरिकांना वाचवण्यासाठी राज्य आपत्ती निवारण दलाला (एसडीआरएफ) पाचारण करण्यात आले असून लहान होड्या आणि बोटींच्या साहाय्याने नागरिकांना बाहेर काढण्याची मोहीम सुरु झाली आहे.

आधीच पुराने बेजार झालेल्या मराठवाड्यावर आता पुन्हा एकदा आभाळ फाटल्याचं चित्र आहे. सतत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे गोदावरी नदीला पूर आला आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर आणि नांदेडमध्ये मोठ्या प्रमाणात पूरस्थिती निर्माण झाल्याचं दिसतंय. त्यातच अनेक ठिकाणच्या धरणांमधून विसर्ग वाढवण्यात आल्याने पुन्हा एकदा धाकधूक वाढली आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाला अलर्ट राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**मुंबईमध्ये अनेक ठिकाणी पाणी साचलं**

मुंबईच्या पश्चिम उपनगरात रविवारी सकाळपासूनच मुसळधार पाऊस सुरू आहे. अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर, विलेपार्ले, सांताक्रुझ, वांद्रे या सर्व परिसरात जोरदार पाऊस सुरू आहे. असाच पाऊस सुरू राहिल्यास अनेक भागात पाणी साचण्याची शक्यता आहे.

**नाशिकमध्ये पावसाचा कहर**

नाशिकच्या मनमाड शहर आणि परिसरात शनिवारी रात्रीपासून पावसाने अक्षरशः कहर केला. पावसामुळे मनमाड शहरातून वाहणाऱ्या पांझण आणि राम गुळणा नदीला या मोसमातील सर्वात मोठा पूर आलाय. नदीकाठच्या गुरुद्वाऱ्यामागील वस्ती, गवळी वाडा, ईदगाह, टक्कार मोहल्ला या भागातील नागरिकांच्या घरामध्ये पाणी शिरले आहे. त्यामुळे घरातील अन्न धान्य आणि संसारोपयोगी वस्तू पुराच्या पाण्यात वाहून गेल्या. प्रशासनाने तसंच या भागातील सामाजिक कार्यकर्त्यांनी पुरात अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढले. त्यांचे संसारोपयोगी साहित्यही सुरक्षितस्थळी हलवण्यात आले.

**पालघरमध्ये धरणे भरली, नदीकाठच्या गावांना इशारा**

पालघरमध्ये सूर्या प्रकल्पाच्या धामणी धरणाचे पाचही दरवाजे पन्नास सेंटीमीटरने उघडले आहेत. धामणी आणि कवडास धरणातून सूर्या नदीत 47 हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. सूर्या प्रकल्पाचे धामणी धरण 100 टक्के भरलं. तर कवडास धरण ओवर फ्लो आहे. या धरणांमधून सूर्या नदीत सुरू असलेल्या विसगार्मुळे सूर्या नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली. त्यामुळे सूर्या नदी काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**रायगडला रेड अलर्ट**

रायगड जिल्ह्याला आज रेड अलर्ट देण्यात आला आहे. शनिवारी दक्षिण भागात तर रविवारी रायगडच्या उत्तर भागात पावसाचा जोर वाढल्याचं पहायला मिळालं. कर्जत तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे नगरपालिका परिसरामध्ये पाणी साचल्याचं पहायला मिळालं. तर उल्हास नदीच्या पातळीतही मोठी वाढ झाली आहे.

**परभणीत नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा**

परभणी जिल्ह्यातील गोदावरी, पूर्णा आणि दुधना या तिन्ही नद्यांना पूर आलाय. येलदरी धरणाच्या 10 दरवाज्यामधून पूर्णा नदी पात्रात विसर्ग करण्यात येत आहे. नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**धाराशिवात पावसाची उसंत, मात्र पूरस्थिती जैसे थे**

धाराशिव जिल्ह्यात अनेक दिवसांपासून पावसानं थैमान घातलं होतं.. आज सकाळपासून धाराशिव जिल्ह्यात पावसाने उसंत घेतली मात्र नद्यांची पूरस्थिती कायम आहे. नदीकाठच्या शेत शिवारात पाणी अजूनही ओसरलेलं नाही.धाराशिवच्या तेरणा प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू आहे. तेरणा नदी काठच्या गावांमध्ये आतापर्यंत तीन वेळा पूरस्थिती निर्माण झाली होती. आता देखील मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू असल्यानं पाडोळी गावातील नागरिकांचं सुरक्षेच्या दृष्टिकोनातून स्थलांतर सुरू आहे.

**अहिल्यागरच्या शेवगावला पुराचा तडाखा**

अहिल्यानगरच्या शेवगावमध्ये पुराच्या पाण्यातून रस्ता ओलांडण्याचं धाडस करणं अंगलट आल्याचं समोर आलं. पावसामुळे सूर्यकांता नदीला पूर आलाय. या पुरामुळे नदीच्या पुलावरुन पाणी वाहतंय. अशातच एका कार चालकाने नसतं धाडस करुन पाण्यातून चालवण्याचा प्रयत्न केला. मात्र काही अंतरावर गेल्यावर रस्त्याचा अंदाज न आल्याने गाडी अध्यार्हून अधिक पाण्यात बुडाली.पाण्याचा जोर वाढल्याने ते कसेबसे गाडीच्या छतावर चढले. यानंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदतकार्य सुरू केले. सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आले, मात्र फॉरच्युनर कार अद्याप पाण्यातच उभी आहे. दरम्यान शेवगाव तालुक्याचा संपर्क तुटला असून शेवगावला येणारे सर्व रस्ते पाण्याखाली गेल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे.

**बीड-हिंगोलीमध्ये सोयाबीन पाण्यात**

बीड आणि हिंगोली जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. अतिवृष्टीमुळे सोयाबीनचं पीक पाण्यात गेलं. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडलाय. सोयाबीनचे पीक दसरा दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या हाती लागते होते. परंतु या पुरामुळे सोयाबीन पीक पूर्ण नष्ट झालं आहे. आता पीक वाया गेल्यानं आता मुलांच्या शाळेची फी कशी भरणार? असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.

**यवतमाळमध्ये अनेक घरांत पाणी**

यवतमाळच्या आर्णी शहराला अरुणावती नदीच्या पुराचा फटका बसला असून अनेक नागरिकांच्या घरात पुराचं पाणी शिरलं आहे. पुराचं पाणी शिरल्याने नागरिकाचे जीवनाशक वस्तूचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचं चित्र आहे. शनिवारी रात्री आलेल्या पुरामुळे आर्णी शहरातील मोबीनपुरा, शास्त्री नगर आणि झोपडपट्टी परिसराला पुराचा फटका बसला. सध्या पूर ओसरला असला तरी काही भागात अजूनही पुराचे पाणी साचलेलं आहे.

**जळगावात नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा**

जळगाव जिल्ह्यात झालेल्या दमदार पावसामुळे चाळीसगाव तालुक्यातील मन्याड धरणाच्या माणिकपुंज प्रकल्पात पाण्याची मोठी वाढ झाली आहे. मन्याड धरणावरील माणिकपूंज प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरु आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

---

## 'माहिती अधिकार दिन' २९ सप्टेंबर रोजी साजरा करण्याचे निर्देश




**■मुंबई । प्रतिनिधी,**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठातर्फे राज्य शासनाने जारी केलेल्या निर्णयानुसार २८ सप्टेंबर हा दिवस ह्यआंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिनह्व म्हणून साजरा केला जातो. मात्र यावर्षी २८ सप्टेंबर हा दिवस रविवार असल्याने माहिती अधिकार दिन सोमवार दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठाच्या उप सचिव व कार्यालय प्रमुख श्रीमती रीना फणसेकर यांनी दिली आहे.

या निर्णयाची अंमलबजावणी करताना सर्व शासकीय कार्यालयांनी माहिती अधिकार दिनानिमित्त विशेष उपक्रमांचे आयोजन करावे, असे निर्देश सर्व कार्यालयांना देण्यात आले आहेत.

माहिती अधिकार कायदा, २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तसेच पारदर्शक, जबाबदार व लोकाभिमुख शासन व्यवस्था नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी या दिनाचे विशेष महत्त्व असल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. माहिती अधिकार कायद्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रम, जनजागृती उपक्रम, परिसंवाद, कार्यशाळा व मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सोमवार दिनांक २९ सप्टेंबर रोजी सर्व शासकीय कार्यालयांनी हा दिन औपचारिकरीत्या साजरा करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठाच्या उप सचिव व कार्यालय प्रमुख श्रीमती रीना फणसेकर यांनी केले आहे.

---

## डहाणू तालुक्यात जिल्हा प्रशासनाचे बचावकार्य यशस्वी

### १६ महिला व बसचालक सुखरूप बाहेर

**■पालघर। प्रतिनिधी,**

जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली डहाणू तालुक्यात हाती घेण्यात आलेले बचावकार्य यशस्वी ठरले. अतिवृष्टीमुळे डहाणू तालुक्यातील चरी गावाजवळील रस्त्यावर अडकलेल्या बसमधून १६ महिला आणि बसचालकासह एकूण १७ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात प्रशासनाला यश आले.

हवामान विभागाने पालघर जिल्ह्यासाठी अतिवृष्टीचा इशारा दिला होता. त्यानंतर काही तासांतच डहाणू परिसरात मुसळधार पावसाची सुरुवात झाली. पाण्याच्या प्रवाहात बस अडकून मोठा अनर्थ ओढवण्याची शक्यता निर्माण झाली होती. तात्काळ जिल्हा प्रशासनाने धाव घेतल्याामुळे सर्वजण सुरक्षित बाहेर आले.

या बचावकार्यात डहाणू पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण पवार जखमी झाले असून त्यांच्यावर डहाणू येथील उपजिल्हा रुग्णालय, येथे उपचार सुरू आहेत.

बचावकार्या दरम्यान डहाणू उपविभागीय पोलीस अधिकारी अंकिता कणसे , तहसीलदार सुनील कोळी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता नितीन पगारे,नगरपालिका कर्मचारी, तसेच विविध यंत्रणांचे सहकार्य लाभले.

बचाव करण्यात आलेल्या सर्वांची प्राथमिक आरोग्य तपासणी करून त्यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सुदैवाने सर्वजण सुरक्षित आहेत. वेळेत हाती घेतलेले प्रशासनाचे प्रयत्न आणि जिल्हा यंत्रणांची समन्वयात्मक कामगिरीमुळे दुर्घटना टळली.

---

## आरोपींची पोलिस व्हॅनमध्ये पोलिसांवरच दादागिरी; मारहाण, शिवीगाळ अन पोलिसांवर फेकली बियार्णी

**■कल्याण । प्रतिनिधी,**

कल्याण कोर्ट परिसरात उभ्या असलेल्या पोलिसांच्या गाडीत पोलिसांनाच मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. या घटनेने आरोपींना पोलिसांची आणि कोटार्ची कोणाचीच भीती राहिलेली नाही का, असा सवाल उपस्थित होत आहे. पोलिसांना मारहाण प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याण न्यायालयात परिसरात गुरुवारी वेगवेगळ्या गुन्ह्यातील आरोपींना न्यायालयात हजर करण्यासाठी आणण्यात आले. या कैद्यांच्यासोबत मध्यवर्ती कारागृहाचे पोलीस होते. पोलीस आरोपींना कल्याण न्यायालयात हजर करण्यासाठी आले असता दुपारी 1.45 वाजण्याच्या सुमारास पोलीस आणि कैद्यांमध्ये वाद झाला. न्यायालयाच्या पार्किंगमधील सरकारी पोलीस वाहन क्रमांक MH12 द 6855 या पोलीस व्हॅनमध्ये आरोपी आणि पोलीस बसलेले होते. त्या वाहनातील आरोपी आकाश वाल्मीकी, गणेश



उर्फ शालु मरोठीया, योगींदर उर्फ भोलू मरोठीया, विवेक यादव (सध्या सर्व रा. आधारवाडी जेल, कल्याण प.) यांना जागा नसल्याने, तुम्ही सर्वजण पाठीमागे जावून बसून घ्या असे पोलीस नाईक किशोर पेटारे यांनी सांगितले. पोलीस नाईक पेटारे यांनी कैदांना मागे जाऊन बसा सांगितल्यामुळे कैदी रागावले आणि त्यांनी पोलिसांना धक्काबुक्की सुरु केली. वदीर्तील पोलिसांच्या अंगावर हात टाकला. त्यांची कॉलरपकडून त्यांना आरोपी दमदाटी करु लागले. आरोपींनी पोलिसांना चापटा, बुक्के मारायला सुरुवात केली. किशोर पेटारे यांच्यावर ठोश्याबुक्क्यांनी मारा करण्यात आला. तेवढ्यात आरोपी आकाश वाल्मिकी याने पोलीस नाईक किशोर पेटारे यांच्या उजव्या कानावर बियार्णीने भरलेली पिशवी मारली. यामुळे त्यांच्या कानाला दुखापत झाली आहे. आरोपींकडून पेटारे यांना शिवीगाळ आणि मारहाण होत असताना तिथे इतरही पोलीस कर्मचारी होते, त्यांच्याकडून आरोपींना रोखण्यात का आले नाही, असाही सवाल आता उपस्थित होत आहे. पोलिसांच्या कामात अडथळा आणि त्यांना कर्तव्यापासून परावृत्त करण्यासाठी हल्ला करण्यात आला.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# हा विरोधाभास कधी संपणार?



नवरात्रात स्त्रीशक्तीची पूजा केली जाते, पण वास्तवात स्त्रियांना आजही अन्याय, हिंसा आणि दुजाभावाला सामोरे जावे लागते. देवीला अष्टभुजा देऊन शक्तिमान मानले जाते, तरी प्रत्यक्षात स्त्रियांना कमकुवत समजले जाते.

सध्या महाराष्ट्रात आणि देशभरात घटस्थापनेपासून दुर्गा उत्सव सुरू आहे. नवरात्र सुरू झाले आहे. खरंतर हा सृजनाचा उत्सव, स्त्रीत्वाचा उत्सव. शेतीचे नाते सांगण्याचा उत्सव. स्त्रिया आणि जमीन या सृजनशील आहेत. निर्मितीक्षम आहेत. प्रेम, कारुण्य, वात्सल्य आणि त्यासोबत लढवय्या, निर्भय, चुकीला चूक आणि बरोबरला बरोबर म्हणण्याची क्षमता ठेवतात. या संपूर्ण सजीव सृष्टीत स्त्रियांनी सर्वश्रेष्ठ असे जर कोण असेल, तर तो माणूस जन्माला घातला. आजही विज्ञान कितीही पुढे गेले असले, तरीही सरोगेट करून म्हणजेच गर्भाशय भाड्याने घेऊन का होईना पुरुषांना बाईच्या गर्भाशयातूनच बाईच्या पोटी जन्म घ्यावा लागतो. तरी तिचं सामाजिकीकरण होत असताना भारतासह देशभरामध्ये तिला दुजाभावाने वागविले जाते. तिला सतत हिंसेला तोंड द्यावे लागते.

भारत हा फार गमतीशीर देश आहे. एका बाजूला शक्तीची देवता म्हणून महिषासुरमर्दिनीची पूजा केली जाते, नवरात्र साजरी केली जाते. तिला देवी म्हणून शक्तिमान मानले जाते. तिच्या आठ भुजांमध्ये शस्त्र देऊन पायाखाली राक्षस देऊन ती कसा दुष्टांचा संहार करू शकते हे दाखविले जाते. पण प्रत्यक्ष बाईला नाजूक समजले जाते. कमकुवत समजले जाते. बायकाही त्या नाजूकपणाचा अभिमान बाळगताना दिसतात. नटणे, मुरडणे, चवळीच्या शेंगेसारखी असणे स्त्रियांना भूषणावह वाटते. नवरात्रीतील देवी म्हणून अष्टभुजा देवतेने शक्तिमान असले पाहिजे, पण आपण बाई म्हणून नाजूक, मुळूमुळू रडणारी असली पाहिजे, असाच स्त्रियांचा आणि पुरुषांचा देखील कुटुंबात समज असतो.

शाळांमध्ये बुद्धीची देवता म्हणून सरस्वतीची पूजा केली जाते. आमच्या लहानपणी तर शाळेत आम्ही दहा पैशाची वर्गणी काढून सरस्वतीचे पूजन करून फुटाणे वाटायचो. गूळ-चणे किंवा साखर-चणे हा शुक्रवारचा शाळेतला प्रसाद असायचा. सरस्वती ही देखील बाईच. बुद्धी हा शब्द देखील स्त्रीलिंगी. पण प्रत्यक्षात व्यवहारात मात्र बाई म्हणजे पायातली चप्पल. औरत माने पैर की जुती. बायकांना काही अक्कल असते का? बायकांची अक्कल घुटन्यात. बायका म्हणजे फिदी-फिदी हसणं, मुळूमुळू रडणं. पुरुषांच्या बोलण्यात येते की बाई आहे. तिच्या नादाला नका लागू. बायकांचा आणि अकलेचा काही संबंध आहे का? राखीव आलंय म्हणून त्यांना सहन करायचं. बाई आहे तिच्यासोबत डोकं नका लावू. बुद्धिवान असणं हे पुरुषांसाठी अनिवार्य आहे. स्त्रिया सुंदर असल्या की झाले. किंबहुना बुद्धिमान वगैरे स्त्रिया नसलेल्याच बरे. किंबहुना बुद्धिमान स्त्रियांचे पुरुषांना वावडेच आहे. बुद्धिमान स्त्रियांची पुरुषसत्ताक व्यवस्थेला भीती वाटते. त्यामुळे अगदी लग्न करताना देखील मुलगी बघायला जातात आणि मुलाचं मात्र करिअर, बुद्धी, पगार बघितला जातो. मुलाला कोणी स्वयंपाक येतो का? हा प्रश्न विचारत नाहीत आणि स्त्रिया कितीही शिकलेल्या असल्या, उच्च शिक्षण घेतलेल्या असल्या, कोणत्याही पदावर असल्या, प्रशासक, वकील, न्यायाधीश असल्या तरी तिचं दिसणं आणि तिचं स्वयंपाकपाणी करता येणे, तिने लग्न करणे, तिला मूल होणे अनिवार्य आहे. आता दिवाळी येईल. धनाची देवता म्हणून लक्ष्मीची पूजा केली जाईल. धनलक्ष्मी, भाग्यलक्ष्मी याच्या पूजनाच्या दिवशी हजारो रुपयांच्या फटाक्यांच्या माळा उडवल्या जातील. पाच-दहा रुपयांसाठी गिऱ्हाईकांबरोबर घासाघिस करणारे व्यापारी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी फटाक्यांवर हजारो रुपये खर्च करतील. लक्ष्मी ही देवता आहे. बाईमाणूस आहे. पण धनवान कोण आहे? जमीन, घर, मुलं, सर्व प्रकारची स्थावर, जंगम मालमत्ता ही पुरुषांच्या मालकीची आहे. एकूण कामाच्या दोनतृतीयांश कामं शेतीतील असो, घरातील असो किंवा समाजातील असो स्त्रिया करतात आणि जगभरामध्ये शंभर रुपयातील फक्त एक रुपया स्त्रियांकडे अर्थकारणात आलेला दिसतो. स्त्रिया करत असलेल्या दोनतृतीयांश कामाची पैशांमध्ये मोजदाद केली जात नाही. त्यामुळे देशाचा जीडीपी देखील चुकीचाच निकषांवर मोजला जातो. त्यामुळे घराचं अंदाजपत्रक असो की देशाचं, त्यामध्ये कुठेही स्त्रियांच्या कामाची नोंद नाही. स्त्रियांसाठी अंदाजपत्रकात त्यांची संख्या निम्मी असून देखील तरतूद नाही, स्त्रिया बिनपगारी, फुल अधिकारी. सर्वात आधी उठणार, सगळ्यात शेवटी झोपणार, राबराब राबतात. लक्ष्मीपूजन करणारी इथली परंपरा या गृहलक्ष्मीची, मात्र आपल्या घरात रोज अवहेलना करणार.

म्हणूनच नवरात्रीच्या निमित्ताने प्रश्न विचारावासा वाटतो की, हा जगण्यातला भारतीय समाजातील विरोधाभास कधी संपणार? एका बाजूला तिची देवी म्हणून पूजा करायची आणि दुसऱ्या बाजूला मात्र तिला दासी म्हणून हिणवायचे. सगळ्या शिव्या आई- बहिणीवरून दिल्या जातात. पुरुषांच्या दाढीच्या ब्लेडपासून सगळ्या वस्तूंच्या विक्रीच्या जाहिरातींसाठी स्त्रिया शरीरप्रदर्शन करण्यासाठी यांना लागतात. पुरुषांना शहाणं करण्यासाठी आणि स्त्रियांना न्याय मिळवून देण्यासाठी स्त्रीमुक्ती चळवळीला संघर्ष करून ४२ हून अधिक कायदे बनवायला भाग पाडावे लागले. स्त्रियांच्या हिंसेचा प्रश्न हा जागतिक पातळीवर राजकीय बनतो आहे. गर्भाशयापासून थडग्यापर्यंत सर्वच वयातील स्त्रिया असुरक्षित आहेत. भय व हिंसा सोसत आहेत. भारतात तर आता नवीन विधेयकाप्रमाणे संसदेत आणि विधानसभेत ५० टक्के स्त्रिया खासदार आणि आमदार म्हणून निवडून येणार आहेत. पुरुषांच्या आदेशानुसार फेटा बांधून मोटारसायकलवर बसून आरक्षणाचा मोर्चा असेल, तलाक कायद्यातील बदलाविरोधातील मोर्चा असेल किंवा सीएए, एनआरसी विरोधातील शाहीन बाग असेल याठिकाणी मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या या स्त्रिया स्वतःच्या बाबतीत झालेल्या किंवा अवतीभवती घडलेल्या स्त्रीविषयक हिंसक घटनेच्या विरोधात साधा ब्र देखील काढत नाहीत किंवा निषेधपत्र देखील काढत नाहीत. सर्व दुर्गा मंडळे, नवरात्री मंडळे यातील पदाधिकारी पुरुष आहेत. लाखो रुपयांची या मंडळांची उलाढाल आहे.

पहाटे किंवा संध्याकाळी चौकाचौकातील नवरात्रोत्सवाच्या मंडळासमोर हजारोंच्या संख्येने स्त्रिया पायात चपला न घालता मळवट भरलेल्या, ठरलेल्या विशिष्ट रंगाच्या साड्या नेसून भक्तीने आरतीला टाळ्या वाजवताना दिसतात. निर्मितीचे प्रतीक असणाऱ्या आठही हातात शस्त्रं घेऊन समोर असणारी ती देवी प्रत्यक्ष जगण्याचे आपले प्रश्न सोडवण्यासाठी आपण केलेल्या नवरात्रातील उपवासामुळे प्रसन्न होऊन सोडवायला खरोखरीच येईल असे यांना खरंच वाटते का? लोटलेला भक्तिसागर फॅशनेबल आहे. शिकल्या सवरलेल्या, पदवीधर असलेल्या स्त्रियांच्या चळवळीमुळे राखीव जागा मिळवून, नोकरी-कामधंदा करून पैसे मिळत असलेल्या, बचत गटातील सक्रिय असणाऱ्या, आशा, अंगणवाडी ताई, शिक्षिका, नोकरदार महिला जेव्हा आम्ही स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायविरुद्ध उभे राहण्यासाठी बोलवितो, मोर्चाला निमंत्रण देतो तेव्हा त्या पाठ फिरवतात. परंतु या मांडवासमोरच्या गर्दीत त्या टाळ्या वाजवत उभ्या दिसतात तेव्हा मन विषण्ण होते. या तथाकथित धार्मिक आणि श्रद्धेच्या बाजारातून बाहेर पडून जगण्याच्या प्रश्नाला या कधी भिडणार, असा प्रश्न पडतो?

# जगणं वाहून जाताना!



गेल्या १५ वर्षांत चार वर्षे दुष्काळ. सहा वेळा गारपीट. मग करोना काळातील अतिवृष्टी आणि आता ढगफुटीसदृश पाऊस. जोरदार कोसळणारा, सेकंदा सेकंदाला वाढत जाणारा, कधी प्रवाह बदलून जीवघेणा ठरणारा. पुरात माणसं, जनावरं, पिकं आणि अगदी मातीही वाहून नेणारा. मराठवाड्यात एवढे दिवस पाण्याचं कौतुकच. मोठ्या धरणातील एखादा टक्का पाणी वाढलं तरी एकमेकांना आवर्जून सांगणाऱ्या या दुष्काळी भागातील माणसाला पूर बघण्याची सवयच नव्हती. नदी उकरून किंवा नदी पात्रात डुबक्या घेऊन वाटीने पाणी घागरीत भरणाऱ्या भागातील शेतशिवार आता पाण्यात गेलं आहे. शासन दरबारी नसेल ओल्या दुष्काळाची व्याख्या. पण आहे तो ओला दुष्काळच. कारण शिवारातील पिकांची मुळं आता सडू लागली आहेत. सोयाबीनच्या शेंगा फुटून त्यांना कोंब आले आहेत. उभा ऊस आडवा झाला आहे. खरीप हातचा गेला आहे. जलमय मराठवाड्यातील माणूस पुन्हा हतबल झाला आहे. त्याची ही करुण कहाणी...

रात्रीतून पाणी वाढत गेलं. घरातील मंडळींनी जीव वाचवला. पण दारातील १७ जर्सी गायी दावणीला दगावल्या. १० गायी आणि त्यांची १५ वासरंही वाहून नेली. धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील विश्वनाथ आत्माराम दातखिळेचं सगळं आयुष्यच बदलून गेलं. २७ गायी, वासरं सांभाळत दर महिन्याला एक लाख ८० हजार रुपयांचा दूध व्यवसाय करणारा हा शेतकरी आता हतबल झाला आहे. कडबाकुट्टीचं यंत्र, धारा काढण्याची दोन यंत्रंही वाहून गेली आहेत. आता जगायचं कसं असा प्रश्न त्यांना सतावतो आहे. हे चित्र खव्यासाठी प्रसिद्ध असणाऱ्या सरमकुंडी गावाच्या परिसरातलं.

भूम तालुक्यातील पिंपळगावमध्ये राहणाऱ्या विश्वनाथ यांचा डी. फार्मसी झालेला मुलगा पुण्याहून आला. तो सांगत होता, काय करायचं तेच सुचत नाही. सगळं सुख आणि समृद्धी पूर घेऊन गेला. चिंचपूरच्या दूध डेअरीबरोबरचा दररोज २५० लिटरपर्यंतचा व्यवहार पूर्णतः थांबला आहे. ३६ रुपयांपर्यंतचा दर मिळायचा. त्यामुळे रोख रक्कम हाती येत होती. विश्वनाथ यांची हतबलता पराकोटीची आहे. याच गावाजवळच्या चिंचपूर या गावात दुधाचा व्यवसाय करणारे अनेक जण. अमोल ढगे यांनी सहा महिन्यांपूर्वी पाच लाख रुपयांची उचल घेऊन १० गायी घेतल्या. त्यातील चार वाहून गेल्या आणि पाच दगावल्या. दररोज दीड हजार रुपयांच्या दुधाची विक्री करणाऱ्या अमोलचा पाय आता खोल चिखलात रुतू लागला आहे. घरात खाणारी सहा तोंडं आहेत. पुराने जगण्याची हिम्मतच वाहून गेली. आता पुढं कसं होईल काय माहीत, असं त्याचं पुटपुटणं अनुत्तरित प्रश्नांचं नवं संकटं तयार करणारं. लातूरच्या औराद शाहजानी येथे तेरणा आणि मांजरा नदीचा संगम होतो. तिथं शिवपुत्र आगलावे यांची २१ एकर शेती आहे. या वर्षी अगदी मृगापासून चांगला पाऊस झाल्याने मूग, उडीद ही पिकं त्यांनी घेतली. पुढं काढणीच्या वेळी पाऊस झाला. मूग काळे पडले. मांजरा नदीला तेरणाचं पाणी मिसळलं की तेरणा नदी शेतात पसरत जाते. या वेळी पुरात ११ एकर ऊस पाण्यात आहे. सोयाबीन पिवळं पडलं आहे. मुळं सडली आहेत. ही स्थिती नदीकाठच्या प्रत्येक गावाची. या वर्षीच्या पिकाचं नुकसान सहनही करता येईल. पण शेती दुरुस्त करून, आहे ते पीक काढून रब्बीची पेरणी होईल का, असा त्यांचा प्रश्न आहे. नदीकाठच्या शेतकऱ्यांना आता रब्बीत पिकं घेता येणार नाहीत, याचं दुःख अधिक आहे. अनेक ठिकाणी जमिनीला मोठे खड्डे, शेतात बहुतांश ठिकाणी आहे.

नवरात्रीच्या दुसऱ्या माळेला वैजापूर तालुक्यात ढगफुटीसदृश पाऊस झाला. पिकं भुईसपाट झाली. अनेक ठिकाणची जमीनच खरडून गेली. कांद्यासाठी केलेल्या वाफ्यात रोपं बुडून गेली. वैजापूरजवळचेच दीपक साळुंके कांदा उत्पादक. वैजापूरजवळच त्यांची चार ते पाच एकरवर कांद्याच्या रोपांची शेती. उन्हाळी कांद्याच्या रोपांची ते लागवड करतात. यातून त्यांचंही नफ्याचं गणित ठरलेलं असतं. अतिवृष्टीने एका रात्रीत ते बदलून गेलं. तीन महिन्यांनंतर लाखो रुपये पिकातून येतील, हे स्वप्न पुरात वाहून गेलं. एकट्या वैजापूर तालुक्यातील जवळपास १५ हजार एकरवरील कांद्याचं पीक नष्ट झालं.

पणन मंडळावरील संचालक सीताराम वैद्या यांची शेती वैजापूर तालुक्यातील लाख खंडाळा गावात. त्यांनी तीन एकरवर खरिपातील लाल कांद्याची पुनर्लागवड केलेली. तीन महिन्यांनंतर एकरी १२५ ते १३० क्विंटल उत्पादन अपेक्षित होतं. तीन एकरात साधारण पाच लाखांपर्यंतचं उत्पन्न कांद्यातून मिळेल, ही आशा आता मातिमोल झाली आहे.

गाळात चालली शेती...

आष्टी तालुक्यातील पेटपांगरा गावातील तलाव अतिवृष्टीने फुटला. पावसाचा जोर एवढा होता की, तलावातील गाळ, पाणी सारं सोपान कारभारी मिसाळ यांच्या शेतात शिरले. सोपान आणि त्यांचे भाऊ यांच्या नावावर प्रत्येकी साडेतीन एकर जमीन. थोडीशी जमीन आईच्याही नावे. पहिल्या टप्प्यात चांगला पाऊस झाल्याने कापूस, कांदा, तूर हे पीक लावले. पण एकाच पावसाने सारं पीक गेलं. विहिरीमध्ये गाळ शिरला. ती पूर्णतः बुजलीच. विहिरीतील मोटार, ३० पाइप वाहून चिखलात कुठं बुजले काय माहीत ? सोपानच्या शेतात आता मोठेमोठे दगड आहेत. सोपानला ऊसतोडणीला जाण्याचे वेध लागले आहेत. दसऱ्यापर्यंत जेवढे होईल तेवढे दगड हटवू. मग जमलं तर रब्बी पेरू असा त्याचा मानस. शेवगाव तालुक्यातील गंगामाई कारखान्यावर ते जाणार आहेत. त्यांचा मुलगा राज्य सेवा आयोगाच्या परीक्षेच्या तयारीसाठी पुण्याला आहे. मुलगी १२ वी शिकते आहे. आता पुढं काय करायचं, हे कळत नाही. उसतोडणी हाच पर्याय समोर आहे. ते आणि त्यांची पत्नी पुन्हा स्थलांतराच्या तयारीला लागले आहेत. एक मोठी विहीर आता बुजली आहे. पावसाने सारं वाहून गेलं आहे. याच गावात नदीकाठच्या ४० विहिरी काही अंशतः तर काही पूर्णतः गाळाने भरल्या आहेत. आता गाळ काढायला पैसे हवेत. मोटार पाइपसाठी सुमारे ५० हजार रुपये लागणार आहेत. कोयता एवढंच पैसे मिळविण्याचं साधन हातात आहे.

नांदेडच्या मुखेड तालुक्यातील रामकुमार इंगोले आणि उत्तम जाधव यांचा बांधाला बांध. दोघांची शेती वाहून गेली. विहिरीच्या भोवतलाचे पाइप तर गेलेच, पण तुषार सिंचनाचे ३० पाइप, ६० नोजल गेले. पाण्याची मोटार बंद पडली. त्यात चिखल गेला. आता पुन्हा ती यंत्रणा उभी करायची असेल तर दीड लाख रुपये लागतील. पांडुरनी गावातील उत्तमराव जाधव यांना आता मुलांच्या शिक्षणाची चिंता आहे. कारण शेत दुरुस्तीला एकरी सहा ते सात हजार रुपयेही पुरणार नाहीत. एवढा पैसा आणायचा कोठून ?

पूर ओसरतोय, पाय मात्र गाळातच!

आता पुराचं पाणी ओसरू लागलं आहे. इथं काही तरी पीक होतं याच्या फक्त आता खाणाखुणा शेतात दिसू लागल्या आहेत. त्याबरोबरच येणाऱ्या दिवसांचं भीषण वास्तव गिरीश उत्तमराव शिंदे या तरुण शेतकऱ्याच्या डोळ्यासमोर दिवसासुद्धा अंधारी आणणारं आहे. पूर्णा तालुक्यातील मुंबर या गावात त्यांची चार एकर शेती आहे. गोदाकाठी असलेलं हे शिवार आहे. ऑगस्ट महिन्यातच एकदा या शिवारात ढगफुटी झाली होती. पारंपरिक पिकात काही उरत नाही म्हणून गिरीश यांनी एक एकर वांग्याचा प्लॉट तयार केला. त्यासाठी खर्चही केला. आजही ग्रामीण बँकेचं पीककर्ज गिरीश यांच्या डोक्यावर आहे. ऑगस्टमधल्या ढगफुटीत वांग्याला तडाखा बसला, एवढंच नाही तर वांग्यासाठी केलेलं ठिबक सिंचनाचं साहित्यही वाहून गेलं. हळहळत न बसता गिरीश यांनी वांगी काढून त्याच ठिकाणी पालक हे भाजीपाला वर्गीय पीक घेतलं. एक एकर भेंडीही केली. आता अतिवृष्टीचा फटका तर बसलाच पण गोदावरीला आलेल्या पुराचं पाणी शेतात घुसलं. दोन-तीन दिवस शेतात करून पावसाने पदरातलं सगळंच नेलं. सोयाबीनची पूर्ण माती झाली. आता केवळ काड्या शिल्लक आहेत. कापसाला बोंडं आलेली होती. ती पावसात भिजली, पुराच्या पाण्यात सडली. एक एकर मूग पेरलेला होता त्याचंही काहीच शिल्लक राहिलं नाही. गिरीश यांना ही सगळी वाताहत सांगण्याचं अवसानही शिल्लक राहिलेलं नाही. पुराच्या पाण्याने शेतातल्या विहिरीत सगळा गाळ जाऊन बसला. आता तर जवळ फुटकी कवडीही नाही. खरिपातून एक रुपयाही निघाला नाही. उलट पुढं खूपच मोठा खचार्चा खड्डा झाला आहे. पुढचे दिवस कशाच्या आधारावर ढकलायचे असा प्रश्न या तरुण शेतकऱ्याचा आहे. पारंपरिक पिकं घेण्यापेक्षा शेतीत नवं काही तरी करावं म्हणून वांगी, भेंडी, पालक असं सगळं काही करून पाहिलं, पण सगळंच मातीमोल झालं आहे. दोघं नवरा-बायको शेतात राबतात. गिरीश यांना दोन मुली आहेत. त्या परभणीला शिकतात. मोठी मुलगी दहावीत तर धाकटी आठवीत आहे. एकीकडं शेतातल्या गाळात रुतलेले पाय, दुसऱ्या बाजूला डोक्यावर असलेलं पीक कर्ज, घराचा खर्च, मुलींचं शिक्षण असा सगळा विचार केला तर त्यांना डोळ्यासमोर अंधार दिसू लागतो. एक पाय गाळातून काढल्यानंतर दुसरा पाय गाळात रुतत जातो. गोदावरी, दुधना, पूर्णा या मोठ्या नद्या, इतरही छोट्या छोट्या नद्या, ओढे नाले यांच्या काठावर असलेल्या शेतकऱ्यांची गत गिरीशसारखीच आहे.

पूर वाढत जाताना...

रात्रीचे दीड वाजलेले. देवगड, नागमठाण आणि माळुंजा या सरिता मापन केंद्रातून किती पाणी येऊ शकेल, याचा अंदाज आला. पूरपरिस्थिती निर्माण होईल, असं लक्षात आलं. जायकवाडीतून एक लाख १३ हजार प्रतिसेकंद घनफूट वेगाने पाणी सोडावं लागलं. आधी जायकवाडीच्या उजव्या बाजूचे १८ दरवाजे उघडण्यात आले. पुढे २७ दरवाजे उघडण्यात आले.

चार फूट दरवाजे उघडण्यात आल्यानंतर पुढे आपत्कालीन दरवाजे उघडण्यात आले. पुढे हे पाणी माजलगाव धरणात जातं. माजलगावच्या पुढे मंद्रस या गावाजवळ गोदावरी आणि सिंदफणाचा संगम. सिंदफणा नदीला उतार अधिक. त्यामुळे या नदीचं पाणी लवकर पुढं जातं आणि तुलनेने गोदावरीचं पाणी संथ वाहतं. त्यामुळे पाणी पात्राबाहेर यायला सुरुवात होते. सकाळी पाथरी, गंगाखेडमध्ये पाणी शिरलं. सायरन वाजला. २४ तास कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी दरवाजे उघडण्याचं काम करण्याआधी धरणाखालील भागातील जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिली जाते. या महिन्यात ही प्रक्रिया तीन वेळा घडली. गोदापट्ट्यात नदीकाठच्या शेतशिवारात पाणीच पाणी झालं. जायकवाडीच्या ३५ हजार हेक्टरवर किती पाऊस पडला, याचं मोजमाप घेता येत नाही. तो अंदाज बांधावा लागतो. पूर नियंत्रणाचा हा खेळ कधी रात्री सुरू होतो तर कधी पहाटे. पुराने अधिक विध्वंस करू नये, याची काळजी घेतली तरी जे घडते आहे त्याची भीषणता खूप अधिक आहे. कधी जायकवाडी, कधी मांजरा, कधी सिना, विष्णुपुरी या पुराच्या पाण्याबरोबर तलाव फुटले आणि निम्मा मराठवाड्यात ओला दुष्काळ आला आहे. पावसाने जणू जगणंच वाहून नेलं. पण याला फक्त पाऊसच जबाबदार नाही. शेती खालच्या बाजूला आणि सिमेंट रस्त्याची कामं वरच्या बाजूला, नदीपात्रातील अतिक्रमणं आणि वाळू उपसा करणारी अजस्त्रा यंत्रणा हे सारंदेखील तितकंच जबाबदार आहे.

दुष्काळ, गारपीट, अतिवृष्टी आणि आता ढगफुटी

मराठवाड्यातील ४८३ महसूल मंडलामध्ये अतिवृष्टी झालेली मंडलं आहेत ४५१. यात एक वेळा अतिवृष्टी झालेली मंडलं ८५, दोन वेळा अतिवृष्टी झालेली मंडलं ११७, तीन वेळा ११३ मंडलांमध्ये अतिवृष्टी, तर ८७ मंडलांमध्ये चार वेळा, २८ मंडलामध्ये पाच वेळा, १५ मंडलांमध्ये सहा वेळा अतिवृष्टी झाली आहे. सात वेळा अतिवृष्टी झालेली सात मंडलं आहेत. गेल्या १५ वर्षांत सहा वेळा गारपीट झाली आहे आणि चार वेळा दुष्काळ पडला आहे. २०१२ मध्ये ६९ टक्के, २०१४ - १५ मध्ये ५३ टक्के, २०१५ मध्ये ५६ टक्के, २०१८ - १९ मध्ये ६४ टक्के एवढाच पाऊस नोंदवला गेला होता. परिणामी २०१६ मध्ये मराठवाड्यात सर्वाधिक ४०१५ टँकरने पिण्याचं पाणी पुरवावं लागलं होते. ७६ पैकी ७१ तालुक्यातील भूगभार्तील पाण्याची पातळी किमान अडीच ते तीन मीटरने घसरली होती. आता त्याच मराठवाड्यात अतिवृष्टीही झाली आणि ढगफुटीही. हवामान बदलाचा लंबक एका टोकावरून दुसऱ्या टोकावर पोहोचला आहे. नव्या पर्यावरणीय अभ्यासाची गरज आहे. हे मान्य असूनही साधं डॉपलर रडार बसवण्यासाठी गेली पाच वर्षे प्रशासकीय पातळीवर कागदपत्रं पळताहेत. त्याचं श्रेय घेणारी मंडळी ढोल, ताशे आणि नगारे वाजवताहेत.

कांदा सडला...

नाशिकला लागून असलेल्या पट्ट्यात वैजापूर तालुक्यात वषार्ला ५०० नव्या कांदा चाळीची भर पडते. वैजापूर तालुक्यात आतापर्यंत सहा ते सात हजार कांदा चाळींना मंजुरी दिली होती. बहुतांश कांदा भिजला आहे. आधीच दर घसरले होते. आता कांदा सडला आहे.

शेतात पाणी

सिंदफणा आणि गोदावरी नदीच्या पुरामुळे अनेकांच्या शेतात पाणी आलं. विहिरी गाळाने भरल्या. अगदी पाणीपुरवठ्याच्या २८ विहिरी बुजल्याने माजलगाव, आष्टीमध्ये टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो आहे. आजही अनेक गावांत वीजपुरवठा खंडित आहे.

आभाळच फाटलं, संसाराला आधार तरी कसा द्यायचा?

घट बसले तेव्हा पहिल्या माळेला पाऊस सुरू झाला. सविताबाईंचं पाऊस मोजण्याचं तंत्र वेगळं. आता सहावी माळ आहे. पाऊस काही थांबला नाही. नदीला पाणी आलं. घराघरात घुसलं. आता सगळं काही भिजलं आहे. अंथरूण, पांघरूण, घरातील भांड्यांमध्ये चिखल जाऊन बसला. धान्य भिजलं. मुलांची दप्तरं भिजली. हे कपडे वाळले तरी पुन्हा विरून जातील... सविता पाटील सांगत होत्या. वाहेगव्हाणमध्ये पुन्हा पाऊस सुरू झाल्याने पुन्हा गोळा केलेला संसार आवरायची त्यांना घाई होती. त्या घाईघाईत एवढंच म्हणाल्या, 'आता आवरायचं काय आणि सावरायचं काय..' काही जणी मदतीला आल्या. सगळ्यांनी मिळून काही कपडे कोरड्या ठिकाणी नेले. गावातील समाजमंदिरात सारे जमले. गेल्या सहा दिवसांपासून तिथेच गावकरी जेवण शिजवतात. पण चिंता आता पुराची नाही. होणारे नुकसान होऊन गेले आहे. सविताबाई सांगत होत्या. गावात जवळपास ५० हून अधिक जणी मजुरीला जाणाऱ्या. कधी खुरपणी, कधी निंदणीसाठी जाणाऱ्या. आता गावातील शिवारात पीकच राहिले नाही. त्यामुळे चिंता आहे आता संसाराला आधार तरी कसा द्यायचा? परंडा तालुक्यातील तांदुळवाडीच्या सारिका शिंदे यांचं दोन एकर शेत. दोन दिवस स्वतः शेतात राबायचं आणि उरलेले दिवस मजुरी करायची. महिनाभरापूर्वी पिकं बहरात होती. मजुरी २५० वरून ३०० रुपयांपर्यंत आपोआप गेली. बडे शेतकरीही मजुरी वाढवायला तयार होते. पण पाऊस सुरू झाला आणि काम थांबलं. आता गेल्या महिन्यापासून गावातील सगळ्या महिलांचा रोजगार पूर्णतः थांबला आहे. शेतीच खरवडून गेली आहे.

# संरक्षणसिद्धतेत भारताचे प्राईम यश

भारतीय संरक्षण व्यवस्थेच्या दृष्टिकोनातून दोन महत्त्वपूर्ण घडामोडी परवा एकाच दिवशी घडल्या. भारतीय संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात डीआरडीओ व सामरिक बल कमांडने तब्बल 2 हजार किलोमीटर दूरपर्यंतची मारक क्षमता असलेल्या अग्नी प्राईम या क्षेपणास्त्राची चक्क रेल्वेगाडीतून चाचणी घेतली. तर दुसरीकडे, भारतीय संरक्षण मंत्रालयाने हिंदुस्थान ॲरोनॉटिक्ससोबत 97 स्वदेशी तेजस मार्क 1 ए लढाऊ विमानांच्या खरेदीसाठी तब्बल 62 हजार कोटी रुपयांचा करार केला आहे. या दोन्ही घडामोडींना अनोखा सुवर्णकांचन योग म्हणता येईल. पहिली घडामोड म्हणजेच पूर्णतः कार्यरत असलेल्या रेल्वे आधारित मोबाईल लाँचर सिस्टममधून मध्यम श्रेणीच्या (इंटरमीडिएट रेंज) अग्नी-प्राईम क्षेपणास्त्राचे प्रक्षेपण करण्यात आले. भारताने आतापर्यंत जमीन, लढाऊ जहाज आणि लढाऊ विमानांतून विविध श्रेणींच्या अग्नी क्षेपणास्त्रांचे प्रक्षेपण केलेले आहे. परंतु पहिल्यांदाच रेल्वेगाडीतून अशा प्रकारची चाचणी घेण्यात आली आहे. ही चाचणी अतिशय गुंतागुंतीची मानली जाते. त्यामुळे या चाचणीमुळे भारत रेल्वे नेटवर्कमधून कॅनिस्टराइज्ड लाँच सिस्टम विकसित करणार्या मोजक्या देशांच्या पंक्तीत जाऊन बसला आहे. अग्नी प्राईम हे एक अण्वस्त्रवाहक क्षेपणास्त्र आहे. भूमिगत तळावरून, रस्त्यावरून, विमानातून, पाणबुडीपाठोपाठ आता रेल्वेतूनही हे क्षेपणास्त्र डागता येईल. अशा प्रकारे रेल्वेतून क्षेपणास्त्र डागण्याची क्षमता विकसित करणे हे एकप्रकारे भारताच्या क्षेपणास्त्र सिद्धतेतही मोलाची भर घालणारे आहे. या क्षेपणास्त्राची 2 हजार किमीची मारक क्षमता पाहता पाकिस्तानच काय तर चीनही भारताच्या सहज टप्प्यात असेल. कोणत्याही देशाची खरी ताकद त्या देशावर शत्रूपक्षाकडून हल्ला झाल्यावरच दिसून येते. या काळात बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि हवाई संरक्षण प्रणाली महत्त्वाची भूमिका बजावतात. पाकिस्तानविरुद्धच्या अलीकडच्या ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने हे सक्षमपणे सिद्ध करून दाखवले आहे. भारताने नियंत्रण रेषा अथवा आंतरराष्ट्रीय सीमा न ओलांडताच पाकिस्तानातील दहशतवादी प्रशिक्षण तळांवर अत्यंत अचूक आणि विध्वंसक हल्ले करून हे तळ उद्ध्वस्त केले. चिनी, तुकीर्येचे ड्रोन हवेतल्या हवेत टिपून भारतावर आक्रमण करण्याचे नापाक इरादेही उधळून लावले. हे सर्व शक्य झाले ते भारताकडे असलेल्या तांत्रिकदृष्ट्या प्रगत, स्वदेशी बनावटीच्या आणि उच्च मारक क्षमता असलेल्या शस्त्रास्त्रांमुळेच. ज्यामध्ये अत्यंत सामर्थ्यशाली ब्रम्होस क्रूझ क्षेपणास्त्राचा वरचा क्रमांक आहे. त्याच जोडीला भारत-पाक संघर्षाच्यावेळी भारतीय आकाशाला सुरक्षेचे अभेद्य कवच घालण्याचे काम आकाश मिसाईलने करून दाखवले. भारतीय क्षेपणास्त्रांच्या ताकदीचा आणि अचूकतेचा जलवा सार्या जगाने बघितला होता. तेव्हापासून आकाश एअर डिफेन्स क्षेपणास्त्र प्रणाली आणि ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्राची जगभरात चर्चा सुरू आहे. याच रांगेत अग्नी क्षेपणास्त्र हे अत्यंत दूरवरचा पल्ला गाठणारे भारताचे अत्यंत घातक शस्त्र मानले जाते. रडारमध्ये न येताच शत्रूच्या छातीवर प्रहार करण्याची ब्रम्होसची क्षमता आहे. हवा, पाणी किंवा जमिनीवरून ताशी अडीच हजार ते तीन हजारच्या वेगाने म्हणजे डोळ्याची पापणी लवण्याआधी हे क्षेपणास्त्र 600 किमी अंतरापर्यंतचे सावज सहज टिपते. तर, अग्नीची मारक क्षमता थेट 900 किमी ते 5 हजार किमी इतकी प्रचंड आहे.

# माता महागौरी

महागौरी ही नवदुर्गेचे आठवे रूप आहे, जी नवरात्रीच्या आठव्या दिवशी साजरी केली जाते, ज्याला महाअष्टमी म्हणून ओळखले जाते. तिच्या नावाचा अर्थ अत्यंत तेजस्वी किंवा तेजस्वीपणे शुद्ध असा होतो, जो तिच्या तेजस्वी, दुधाळ पांर्ढया रंगाचा आणि तिच्या पांढऱ्या वस्त्रांचा संदर्भ देतो. ती पवित्रता, शांती आणि कृपेचे प्रतीक आहे आणि तिच्या भक्तांची पापे शुद्ध करते, त्यांना आंतरिक शांती, समृद्धी आणि आध्यात्मिक ज्ञान देते असे मानले जाते. महागौरीला बैलावर स्वार होताना दाखवले आहे, तिच्या चार हातात त्रिशूल (त्रिशूल) आणि ढोल (डमरू) धरलेला आहे, तर इतर दोन हात भय दूर करणाऱ्या आशीवार्दाच्या मुद्रेत आहेत.

प्रतीकात्मकता आणि महत्त्व

शुद्धता आणि श्रेष्ठताः महागौरीचे पांढरे कपडे आणि श्रेष्ठता हे अंधार आणि अशुद्धतेवरील तिच्या श्रेष्ठतेचे प्रतीक आहे.

आत्मशांतीः तिची पूजा शांततेचे आवाहन करते आणि चिंता कमी करते, आंतरिक शांती आणि शांती वाढवते.

कामना पूर्ण करणेः ती तिच्या भक्तांच्या दुःख दूर करण्यासाठी आणि इच्छा पूर्ण करण्यासाठी ओळखली जाते.

आध्यात्मिक जागृतीः ती सहस्त्र चक्राशी (मुकुटचक्र) संबंधित आहे, जी ज्ञान आणि दैवी चेतनेचे प्रतिनिधित्व करते.

मूतीर्शास्त्र

स्वरूपः तिचा रंग तरुण, गोरा आहे आणि ती पांढऱ्या वस्त्रांनी सजलेली आहे.

वाहनः ती तिचे पवित्र वाहन असलेल्या बैलावर स्वार होते.

हातः तिचे चार हात आहेत.

दोन हातात त्रिशूल (त्रिशूल) आणि डमरू (ढोल) आहे.

इतर दोन्ही हात आशीवार्दाचे हावभाव करत आहेत, जे भीती दूर करतात.

पूजा

वेळः नवरात्रोत्सवाच्या आठव्या दिवशी तिची पूजा केली जाते.

नैवेद्यः भक्त तिला सुगंधित मोगरा (अरबी जाई) सारखी शुद्ध पांढरी फुले अर्पण करतात.

मंत्रः तिच्या आशीवार्दासाठी ओम देवी महागौर्यै नमः हा पवित्र मंत्र जपला जातो.



# नवरात्रीमध्ये लवंगाचा हा एक उपाय केल्यास व्हाल कर्जमुक्त

नवरात्रीचे पवित्र दिवस सुरू आहेत. नवरात्रात दुर्गा मातेच्या 9 रूपांची पूजा केली जाते आणि त्यांना विविध नैवेद्य अर्पण केले जातात. माता दुगार्ला लवंग आणि विड्याच्या पानांचा भोग खूप आवडतो. नवरात्रात लवंगाशी संबंधित काही सोपे आणि सोपे उपाय करून तुम्ही दुर्गा मातेला प्रसन्न करू शकता. नवरात्रात लवंगाशी संबंधित उपाय केल्याने घरात सुख, समृद्धी आणि संपत्ती येते. लवंग केवळ आरोग्यासाठीच चांगले नाही तर पूजेतही त्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. चला तर मग जाणून घेऊया लवंगाशी संबंधित ज्योतिषशास्त्रात सांगितलेले काही सोपे उपाय.

नवरात्रीच्या दिवसांमध्ये दुर्गा मातेची आरती करताना दिव्याच्या वातीमध्ये दोन लवंग ठेवा, त्यानंतर त्यात वाती आणि तूप घाला आणि आईची आरती उतारा. लवंगाचा धूर घरातील नकारात्मकता दूर करतो आणि सकारात्मकतेत राहतो. जर



एखाद्या व्यक्तीची प्रगती होत नसेल तर नवरात्रीच्या दिवसांमध्ये लवंगाची जोडी घ्या आणि डोक्यापासून पायापर्यंत सात वेळा फुंकवा. यानंतर या लवंगाला लाल कपड्यात बांधून दुगार्मातेसमोर अर्पण करावे.

हा उपाय केल्याने तुम्ही आर्थिक अडचणींपासून मुक्त होऊ शकता. तसेच तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग सोपा होईल.

घरात जास्त कलह असेल तर. तसेच, जर तुम्हाला वारंवार आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असेल तर या समस्यांपासून मुक्त होण्यासाठी नवरात्रीच्या दिवसात दररोज संध्याकाळी घराच्या मुख्य दारावर लवंगाच्या तेलाचा दिवा लावा. असे केल्याने तुम्ही तुमच्या त्रासापासून मुक्त होऊ शकता. हा उपाय केल्याने तुम्ही घरातील संकटापासूनही सुटका करू शकता. नवरात्रीच्या दिवशी लाल कपड्यात लवंगाची जोडी ठेवून दुर्गा मातेला अर्पण करावी. यानंतर हे बंडल उचलून तुम्ही तुमचे पैसे ज्या ठिकाणी ठेवता त्या ठिकाणी ठेवा. असे केल्याने तुम्ही आर्थिक अडचणींपासून मुक्त होऊ शकता. जर एखाद्याच्या कुंडलीत राहू केतूचा अशुभ प्रभाव असेल तर नवरात्रीच्या दिवशी मंदिरात जाऊन लवंगाचे दान करावे. मंदिरात दोन लवंग ठेवा. हा उपाय तुम्हाला नवरात्रीपासून दर शनिवारी करावा लागेल. हा उपाय कमीत कमी 11 शनिवारी करा.

या गोष्टी लक्षात ठेवा..

खिडक्या आणि दारांकडे लक्ष द्याः खिडक्या आणि दरवाजे काचेच्या ताटात ठेवा आणि दर महिन्याला बदलत राहा.

अंगणात कापूर जाळावाः घराभोवती फिरवा आणि घरातील नकारात्मक ऊर्जा दूर करा.

धार्मिक संगीत आणि उपासनेचे महत्त्वः संध्याकाळी कमी आवाजात धार्मिक संगीत ऐका आणि घरात शांतता राहते आणि नकारात्मक विचार दूर होते.

या उपायांमुळे घरातील वातावरणात शांतता आणि सकारात्मकता प्रस्थापित होते. या उपायांमुळे घरातील वातावरण सकारात्मक बनते.


# नवरात्रीत गरबा का खेळतात? वाचा यामागचं महत्त्व

नवरात्रीच्या काळात सगळीकडे गरबा खेळला जातो. पण गरबा का खेळतात? आणि त्यामागचा अर्थ काय आहे. हे जाणून घेणं गरजेचं आहे. गरबा हे देवीच्या सन्मानार्थ केले जाणारे एक पवित्र नृत्य आहे. या दिवसांत भक्त आनंदाने एकत्र येऊन गरबा खेळतात आणि उत्सव साजरा करतात. गरबा हा शब्द ह्यगर्भा पासून आला आहे. गर्भा म्हणजे गर्भ, जो सृष्टीच्या आधीच्या शक्तीचे प्रतीक मानला जातो. गरब्यात मध्यभागी दिवा ठेवला जातो. हा दिवा देवीला अर्पण केलेल्या श्रद्धेचं प्रतीक आहे.



गरबा खेळताना लोक वतुर्ळात फिरतात. हे वर्तुळ जन्म, मृत्यू आणि पुनर्जन्माच्या अखंड चक्राचे दर्शन घडवते. जसे ग्रह सूयार्भोवती फिरतात, तसेच भक्त दिव्याभोवती नृत्य करतात. गरबा हे उत्साहाचं नृत्य आहे. देवीचा जागर यामार्फत केला जातो. यात हात-पायांची लय ही भगवान शंकर आणि शक्तीच्या एकतेचे प्रतीक मानली जाते. नवरात्रीत दररोज देवीच्या एका रुपाची पूजा करतात आणि गरबा खेळतात. त्यामुळे साधकाची अंतर्गत ऊर्जा जागृत होते आणि भक्तीभाव वाढतो.

# शुभ काम करण्यापूर्वी काय फोडतात नारळ, शास्त्रांमध्ये दडलंय रहस्य



हिंदू धर्मांक शास्त्र, पूजा, पारंपरिक प्रथा यांना फार महत्त्व आहे. शिवाय कोणत्याही शुभ कार्यात सर्वात मोठं महत्तव नारळाला असतं. नारळ फोडल्याशिवाय कोणतंच शुभ कार्य पूर्ण होत नाही. लहान कार्य असलं तरी नारळाची पूजा केली जाते आणि नारळ फोडला जातो. सांगायचं झालं तर, कोणत्याही शुभ कायार्पूर्वी नारळ फोडणं केवळ एक विधी नाही तर वेद, पुराण, ज्योतिष आणि विज्ञानानुसार ते शुभ, पवित्रता आणि दैवी उजेचं प्रतीक देखील आहे.

परंपरेनुसार असं सांगण्यात आलं आहे की, नारळाचं कठीण कवच अहंकार आणि नकारात्मकतेच्या विध्वंसाचं प्रतीक आहे, तर त्याची पांढरी कण आत्म्याच्या शुद्धतेचं प्रतिनिधित्व करतं. कोणत्याही चांगल्या गोष्टीचा शुभारंभ करण्यापूर्वी सकारात्मक उजेर्ला आमंत्रित करण्यासाठी नारळ फोडला जातो.

शास्त्रीय महत्व

वेद आणि पुराणांमध्ये उल्लेख केल्यानुसार -

स्कंद पुराण आणि अग्नि पुराणात नारळाला श्रीफळ असं म्हटलं आहे, ज्याचा अर्थ लक्ष्मीचे फळ आहे. हे समृद्धी, सौभाग्य आणि यशाचे प्रतीक मानलं जातं.

त्रिमूतीर्चे प्रतीक - नारळावरील तीन डोळे ब्रह्मा (निर्मिती), विष्णू (संरक्षण) आणि शिव (विनाश) यांचं प्रतिनिधित्व करतात.

शास्त्रीय पुराव्यामध्ये -

मंत्र ब्राह्मणात असं म्हटलं आहे की श्रीफलन ब्रह्मसंपन्नम् सर्वकायेर्षु पूजितम् म्हणजे, नारळ हे ब्रह्मतत्त्वाने संपन्न असलेलं फळ आहे आणि सर्व शुभ कार्यामध्ये त्याची पूजा केली जाते.

ज्योतिषशास्त्रीय महत्त्व

ग्रह दोष निवारणः वाहत्या पाण्यात नारळ टाकल्याने ग्रहांचे नकारात्मक परिणाम कमी होतात.

शनिवारचे महत्त्वः असं मानलं जातं की शनिवारी पिंपळाच्या झाडाखाली नारळ फोडल्याने शनिदोष कमी होतो आणि भाग्य वाढते.

विशेष तिथीः अमावस्या, नवमी आणि ग्रहशांती पूजा या दिवशी नारळ अर्पण करणं अत्यंत शुभ मानलं जातं.

वैज्ञानिक आणि मानसिक कारणे

शुद्ध पाण्याचे प्रतीकः नारळ पाणी हे बॅक्टेरियामुक्त आणि शुद्ध आहे, म्हणूनच ते अमृताच्या समतुल्य मानले जाते.

अहंकार-त्यागाचा संदेशः कठीण कवच आपल्या अहंकाराचे आणि नकारात्मक विचारांचे प्रतीक आहे.

मानसिक एकाग्रताः नारळ फोडण्याचा आवाज पूजा दरम्यान मानसिक ऊर्जा आणि एकाग्रता वाढविण्यास मदत करतो.

शुभ परिणामांसाठी नारळाचा उपाय

शनिवारी शनिदोष दूर करण्यासाठी नारळ फोडा आणि पाणी अर्पण करा. नवरात्रीत दुर्गा देवीला नारळ अर्पण केल्याने अडथळे दूर होतात. व्यवसायाच्या सुरुवातीला नारळ फोडा आणि त्याचे तुकडे पसरवा जेणेकरून नकारात्मकता दूर होईल.

# नवरात्रीत अष्टमीला होम हवन का करतात?

शारदीय नवरात्रीच्या काळात अष्टमीला विशेष महत्व असते. आख्यायिकेनुसार, ब्रह्मदेवाच्या वरदानामुळे महिषासुर नामक दुष्ट राक्षसाचा पराभव केवळ एक महिला योद्धा करू शकत होती. आदीशक्तीने देवी दुगेर्चे स्वरूप धारण करत महिषासुरावर मिळवलेल्या विजयानिमित्त हा दिवस साजरा केला जातो. इतकंच नव्हे तर दुगार्मातेच्या स्वरूपाची आराधना करताना विशेष होम हवन केले जाते. असे म्हणतात की, अष्टमीला होम हवन केल्याने नकारात्मक गोष्टींचा प्रभाव कमी होतो.

अष्टमी केव्हा आहे?

यंदा शारदीय नवरात्रीत तृतीय तिथीचा दोन दिवसांचा योग आल्याने दहा दिवसांची नवरात्र साजरी केली जात आहे. त्यामुळे 30 सप्टेंबर रोजी, मंगळवारी अष्टमीचे होम हवन केले जाईल. तसेच विशेष दुगार्पूजा आणि कन्या पूजनदेखील करता येईल.

हवन सामग्रीत काय असावे?

अष्टमीच्या होम हवनासाठी हवन कुंड अथवा वेदी, आम्रपल्लव अर्थात आंब्याची पाने, समीधा, कापूर, तूप, रुईची वात, रोळी, हळद, चंदन, अक्षता म्हणजेच तांदूळ, जवस, तीळ, गूळ, साखर, मोहरी, गोंद, गुग्गुळ, सुपारी, लवंग, वेलची, नारळ (अखंड), सुक्या नारळाचे तुकडे, कमलगट्टा (कमळाचे बी), पंचमेवा (काजू, बदाम, मनुका, खजूर, अक्रोड), लाल- पिवळी फुले, गव्हाच्या पिठापासून बनवलेल्या लहान गोळ्या (लाडवासारख्या), दुर्वा, शुद्ध पाण्याने भरलेला कलश, कलावा (लाल-पिवळा दोरा), लाल रुमाल किंवा वस्त्र इत्यादी सामग्री आवश्यक आहे.

अष्टमीचे हवन कसे कराल?

अष्टमीचे हवन करण्यापूर्वी स्नान करून शुचिर्भूत होऊन स्वच्छ वस्त्र परिधान करणे आवश्यक आहे.

हवनकुंड किंवा वेदी स्वच्छ करून घेणे.

सर्व पूजा सामग्री व्यवस्थित स्वच्छ जागेवर ठेवणे.

पूजेची सुरुवात दुर्गा देवीसमोर संकल्प घेऊन करणे.

यासाठी हातात जल, फूल आणि अक्षता (तांदूळ) घेऊन संकल्प सांगावा.

हवन करतेवेळी दुर्गा सप्तशतीचे मंत्र किंवा नवार्ण मंत्र ह्यॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चेह्णचा उच्चार करून आहुती देणे.

आहुतीसाठी जौ (जव), तीळ, तांदूळ, तूप (घी), गूळ, साखर आणि गुग्गुळचा वापर करणे.

लक्षात घ्या.. परंपरेनुसार, किमान 108 आहुती देणे शुभ मानले जाते.

पूणार्हुतीचे महत्त्व

कोणत्याही हवन समाप्तीला पूणार्हुती दिली जाते. ज्यासाठी एका नारळावर कलावा बांधून त्यासोबत सुपारी, नाणे आणि इतर सामग्री ठेवली जाते. हा नारळ तुपात बुडवून मंत्रांसह अग्नीला समर्पित केला जातो. याला पूणार्हुती असे म्हणतात. पूणार्हुतीनंतर देवी दुगेर्ची आरती केली जाते आणि हवन करतेवेळी कळत नकळत झालेल्या चुकांसाठी क्षमा मागितली जाते.

# सांडलेले अन्न का खाऊ नये? जाणून घ्या शास्त्रीय कारण...



हिंदू धर्मात अन्नाला प्रसादाइतकेच पवित्र मानले जाते. आपल्या धर्मग्रंथांमध्ये अन्नम ब्रह्म असे म्हटले आहे, म्हणजेच अन्न ब्रह्म आहे. अन्नपूर्णा देवी अन्नाची प्रमुख देवता मानली जाते, म्हणून प्रत्येक धान्य देवत्वाशी संबंधित मानले जाते. परंतु अन्न जितके पवित्र असेल तितके त्याच्या सेवनाचे नियम कठोर असतील. धार्मिक ग्रंथांमध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की सांडलेले अन्न मानवांसाठी निषिद्ध आहे, कारण ते अदृश्य प्राण्यांचे अन्न आहे. गरुड पुराणातील प्रीतखंडात म्हटले आहे की जमिनीवर पडलेले अन्न लगेच अपवित्र होते. हे अन्न आता देवांचे किंवा मानवांचे राहिलेले नाही, तर ते भूत, पिशाच आणि ब्रह्मराक्षसांचे अन्न बनते. म्हणूनच असे म्हटले जाते की जर एखाद्या व्यक्तीने पतित अन्न खाल्ले तर त्याचे पुण्य कमी होते आणि जीवनात अडथळे वाढतात.

धार्मिक शास्त्रांनुसार, पतित अन्न खाल्ल्याने व्यक्तीचे मन अस्वस्थ होते आणि नकारात्मक उजेर्चा प्रभाव वाढतो. म्हणूनच संत आणि ऋषी ते ब्रह्मराक्षसाचा एक भाग मानतात आणि त्यापासून दूर राहण्याचा सल्ला देतात. शास्त्रे, लोकप्रिय श्रद्धा आणि आधुनिक विज्ञान हे सर्वजण सहमत आहेत की सांडलेले अन्न मानवांसाठी नाही. ते अदृश्य प्राण्यांचा भाग मानले जाते, म्हणून त्याचा आदर केला पाहिजे आणि ते प्राणी आणि पक्ष्यांना अर्पण करणे हा सर्वोत्तम उपाय आहे.

सांडलेले अन्न का खाऊ नये?

शुद्धतेचा नियम - अन्नाचा प्रत्येक कण देवतेचा भाग मानला जातो. सांडलेले अन्न अशुद्ध होते आणि ते पूजेत अर्पण करता येत नाही किंवा पाहुण्यांना वाढता येत नाही.

अदृश्य प्राण्यांचा वाटा - सांडलेले अन्न अदृश्य प्राण्यांसाठी प्रसाद बनते अशी एक लोकप्रिय धारणा आहे. असे प्राणी ते सेवन करून तृप्त होतात.

धार्मिक इशारा - गरुड पुराण इशारा देते की जो कोणी सांडलेले अन्न खातो त्याच्या नशिबावर शाप येतो. त्याला त्यांच्या जीवनात अडथळे, मानसिक ताण आणि बदनामी येऊ शकते.

आरोग्य आणि शुद्धतेचा पैलू - सांडलेले अन्न धूळ, जंतू आणि अशुद्धता आकर्षित करू शकते. म्हणूनच विज्ञान देखील या प्रथेला समर्थन देते.

लोकप्रिय श्रद्धा आणि परंपरा

आजही, सांडलेले अन्न ब्रह्मराक्षांचे आहे ही म्हण गावांमध्ये प्रचलित आहे. वडीलधारी लोकांचा असा विश्वास आहे की जर एखाद्या व्यक्तीने सांडलेले अन्न खाल्ले तर त्यांना ब्रह्मराक्षांचा त्रास होऊ शकतो. या भीती आणि श्रद्धेमुळे आजही लोक जमिनीवर पडलेले अन्न स्वतः खाण्याऐवजी प्राणी, पक्षी किंवा पृथ्वीच्या देवतेला अर्पण करतात. खरं तर, ही परंपरा समाजाला शिस्त शिकवते. ती आपल्याला अन्नाचा आदर करायला शिकवते आणि जे अन्न आता आपले राहिलेले नाही ते आदराने टाकून द्यायला शिकवते. आजही हा नियम केवळ धार्मिक श्रद्धेशीच नाही तर आरोग्य आणि स्वच्छतेशी देखील जोडलेला आहे. डॉक्टर आणि शास्त्रज्ञ असेही म्हणतात की हानिकारक जीवाणू आणि धुळीचे कण सांडलेल्या अन्नावर चिकटू शकतात, ज्यामुळे पोट आणि आतड्यांचे आजार होऊ शकतात. अशाप्रकारे, धर्म आणि विज्ञान दोघेही सहमत आहेत की सांडलेले अन्न खाणे हानिकारक आहे.

# तुळशीच्या लाकडाचे हे उपाय करा, गरिबी होईल कायमची दूर



वास्तुशास्त्रात तुळशीला अत्यंत शुभ मानले जाते. वाळलेल्या तुळशीच्या लाकडामुळे घरात सुख, शांती आणि समृद्धी येते. हे उपाय कसे करायचे ते जाणून घेऊयात. तुळशीच्या लाकडांचा दिवा बनवाः वाळलेल्या 7 तुळशीच्या लाकडाच्या काड्या पांढऱ्या धाग्याने बांधा, त्या तुपात बुडवा आणि भगवान विष्णूसमोर लावा. यामुळे भगवान विष्णू आणि देवी लक्ष्मीचे आशीर्वाद मिळतात जेणेकरून तुमची गरीबी दूर होईल. नकारात्मक ऊर्जा दूर करण्यासाठी उपायः वाळलेल्या तुळशीच्या लाकडाचा एक गठ्ठा बनवा, तो गंगाजलात बुडवा आणि हे गंगाजल संपूर्ण घरात शिंपडा. यामुळे घरातील नकारात्मक ऊर्जा दूर होण्यास मदत होते. प्रवेशद्वारावर तुळशीचे लाकूड लटकवाः वाळलेल्या तुळशीच्या लाकडाला पाण्याने धुवा, पांढऱ्या कापडात बांधा आणि घराच्या प्रवेशद्वारावर लटकवा. यामुळे घरात शांती येईल आणि आनंदाचे वातावरण राहील.

# लोकलवर दगडफेकीची तिसरी घटना, रे रोड रेल्वे स्थानकात तरुणी जखमी

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

उपनगरीय लोकलवर दगडफेकीच्या घटना सुरूच आहेत. रे रोड रेल्वे स्थानकात झालेल्या दगडफेकीत २८ वर्षीय प्रवासी तरुणी जखमी झाली. आठवड्याभरतील ही तिसरी घटना आहे. या तरुणीवर केईएम रुग्णालयात उपचार करण्यात आले.

मुंबई उपनगरीय लोकलमधून दररोज मोठ्या संख्येने प्रवासी प्रवास करतात. मात्र अधूनमधून काही भागांतून लोकलवर दगडफेकीच्या घटना घडतात. या घटनांमुळे प्रवाशांना गंभीर दुखापत झाली आहे. अनेकांना डोक्याला किंवा डोळ्याला इजा झाल्याच्या नोंदी आहेत. शिवडी आणि वडाळा रेल्वे स्थानकात धावत्या लोकलवर दगडफेकीच्या दोन घटना ताज्या असताना शुक्रवारी रे रोड आणि कॉटन ग्रीन स्थानकांदरम्यान धावत्या लोकलवर दगडफेकीची आणखी एक घटना घडली. या घटनेत २८ वर्षीय महिला प्रवासी जखमी झाली. एकाच आठवड्यात लोकलवर दगडफेकीची ही तिसरी घटना आहे.



२८ वर्षीय तरुणी जखमी

परळ येथे वास्तव्यास असलेली २८ वर्षीय तरुणी एका खासगी कंपनीत काम करते. तिने शुक्रवारी संध्याकाळी सीएसएमटी - गोरेगाव हार्बर मार्गावरील धीमी लोकल पकडली होती. मोटरमन जवळील महिलांच्या डब्यातून ती प्रवास करीत होती. रे रोड स्थानक जातात ती कॉटन ग्रीनला उतरण्यासाठी दरवाज्याजवळ आली. अचानक लोकलच्या दिशेने भिरकावलेला दगड तिच्या डोक्याला लागला. कॉटन ग्रीन स्थानकातील स्टेशन मास्तरांनी तिच्यावर प्रथमोपचार केले. त्यानंतर पुढील उपचारासाठी तिला केईएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. संबंधित प्रवासी महिला उपचारानंतर पोलीस ठाण्यात गेली आणि तिने याप्रकरणी तक्रार केली. तिच्या तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल करण्यात येईल, असे वडाळा रेल्वे पोलिसांनी सांगितले.

यापूर्वीच्या दगडफेकीच्या घटना

१८ सप्टेंबर २०२५

दगडफेकीची पहिली घटना गुरूवार १८ सप्टेंबर रोजी घडली. वडाळा पूर्व येथे राहणाऱ्या अनुराधा साव (३९) गुरूवार १८ सप्टेंबर रोजी सीएसएमटी स्थानकातून संध्याकाळी ७ वाजून ७ मिनिटांच्या सीएसएमटी-गोरेगाव धीम लोकलमध्ये चढल्या होत्या. महिलांच्या शेवटच्या डब्यातून त्या प्रवास करत होत्या. शिवडी रेल्वे स्थानक ओलांडल्यानंतर त्या वडाळा स्थानकात उतरण्यासाठी दरवाज्याजवळ आल्या. संध्याकाळी साडेसातच्या दरम्यान रेल्वे रुळाजवळ उभ्या असलेल्या एका व्यक्तीने त्यांच्या दिशेने दगड फेकला. हा दगड आधी त्यांच्या मोबाइलला लागला आणि नंतर थेट त्यांच्या डाव्या डोळ्यावर आदळला. यात त्यांना किरकोळ दुखापत झाली. त्यांना उपचारसाठी लोकमान्य टिळक रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारानंतर त्यांनी वडाळा रेल्वे पोलीस ठाण्यात परत येऊन तक्रार दाखल केली.

२२ सप्टेंबर २०२५

दगडफेकीची दुसरी घटना वडाळा रेल्वे स्थानकाजवळ सोमवार २२ सप्टेंबर रोजी घडली. हर्षदा पवार (२१) ही तरुणी सोमवारी संध्याकाळी आपल्या कार्यालयातून परत येत होती. हर्षदा गर्दीमुळे गाडीच्या फूटबोर्डवर उभी होती. कॉटन ग्रीन आणि रे रोड स्थानकांच्या दरम्यान गाडी असताना, अज्ञात व्यक्तीने अंधारात फेकलेला दगड तिच्या चेहऱ्यावर आदळला. तिच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात आले.

## 'महिला स्वयंसिद्धी'साठी १० लाखांपर्यंत घ्या कर्ज; आवश्यक कागदपत्रे आणि इतर माहिती



■मुंबई। प्रतिनिधी:

इतर मागास प्रवगार्तील गरीब, होतकरू, परित्यक्त्या महिलांचे सक्षमीकरण करून त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर करण्यासाठी राज्य सरकारतर्फे महिला स्वयंसिद्धी योजना राबविण्यात येते. त्याअंतर्गत महिलांना विविध प्रकारच्या उद्योगांसाठी ५ ते १० लाखांपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. तसेच कर्जावर १२ टक्के दराने व्याजाचा परतावा दिला जातो. ही योजना महिला आर्थिक विकास महामंडळाच्या लोकसंचालित केंद्राच्या साहाय्याने राबविण्यात येते.

आवश्यक कागदपत्रे

आधार कार्ड किंवा पॅन कार्ड आदी अधिकृत ओळखीचा पुरावा, रहिवासी प्रमाणपत्र, वयाची पडताळणी करण्यासाठी वयोमयार्दा प्रमाणपत्र तसेच इतर मागासवर्गीय प्रमाणपत्र, बँकेच्या कर्ज मंजुरीचे पत्र, कजार्ची रक्कम व संबंधित कागदपत्रे आदी कजार्साठी लागणारा तपशील, बचत गटाची सर्व संबंधित आवश्यक कागदपत्रे.

अशा प्रकारे देण्यात येतो व्याजदराचा परतावा

महिला बचत गटातील इतर मागासप्रवर्गाच्या महिला अर्जदारांना व्याज परताव्याचा लाभ ओबीसी महामंडळाकडून दिला जातो. बचत गटातील उर्वरित महिलांना महामंडळाकडून इतर शासकीय विभाग, महामंडळाच्या योजनेंतर्गत लाभ देण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

व्यवसायाची संधी कुठे ?

दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय, फळे, भाजीपाला, ॲल्युमिनियम फॅब्रिक शॉप, ऑटो स्पेअर पार्टस, टेलरिंग युनिट, हार्डवेअर, पेंट शॉप, लाकडी वस्तू बनवणे, वीटभट्टी, ग्लास व फोटोफ्रेम सेंटर आदी व्यवसायासाठी संधी आहे.

योजनेसाठी अटी, पात्रता

> अर्जदार महिला राज्यातील रहिवासी असावी. तिचे वय १८ ते ६० दरम्यान असावे.

> अर्जदार गरीब रेषेखालील किंवा मध्यम उत्पन्न वगार्तील असावी.

> अनुसूचित जाती / जमाती / मागासवगार्तील असल्यास प्राधान्य.

अर्ज कुठे करावा?

महिलेने स्वतःच्या जात प्रमाणपत्रातील नमूद जातीनुसार मुख्य कंपनी, उपकंपनी यापैकी लागू होणाऱ्या महामंडळांतर्गत ऑनलाइन योजनेच्या लाभासाठी संकेतस्थळावर अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जदाराने ऑफलाइन स्वरूपात अर्ज करता येतो.

## दांडिया, गरबा मनापासून खेळा, पण हृदयाला जपा; दुर्लक्ष करणे धोक्याचे

■मुंबई। प्रतिनिधी:

नवरात्रोत्सवात गरबा, दांडियामध्ये तरुण मोठ्या संख्येने सहभागी होतात. गेल्या काही वर्षांत गरबा, दांडिया खेळताना तरुण-तरुणी अचानक बेशुद्ध पडल्याच्या घटना समोर आल्या आहेत. काहींना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊ शकतो. त्यामुळे गरबा मनापासून खेळा, पण हृदयाला जपा, असा सल्ला वैद्यकीय तज्ज्ञांनी दिला आहे.

रक्तदाब व हृदयविकाराशी संबंधित त्रास आहे, त्यांनी गरबा खेळताना विशेष काळजी घ्यावी. गरबा किंवा दांडिया हा उच्च तीव्रतेचा ऍरोबिक व्यायाम आहे. ज्यामध्ये व्यक्तीला सातत्याने हालचाल करावी लागते. नाचत राहिल्यास हृदयाला आवश्यक ऑक्सिजन आणि पोषक घटकांची गरज असते, ज्याची पूर्तता करताना हृदयाचे ठोके



आणि रक्तदाब वाढतो, अशी माहिती डॉ. शीतल कर्णिक यांनी दिली.

असा होतो शरीरावर परिणाम

सामान्यतः प्रत्येक व्यक्तीला विशेषतः बैठ्या जीवनशैलीची सवल झाली आहे. अशा व्यक्तीला कोणत्याही प्रकारचा तीव्र व्यायाम किंवा नृत्य करण्यापूर्वी समान्य इको आणि स्ट्रेस टेस्ट करण्याची शिफारस केली जाते.

गरबा किंवा दांडियासारखे खेळ खेळताना प्रचंड धावपळ होते आणि शरीरातील पाण्याची पातळी कमी होते. हृदयाची गती अनियंत्रित होते आणि अचानक हृदय बंद पडू शकते.

वेळीच शरीराची मयार्दा ओळखा

गरबा खेळताना दम लागत असेल, चक्कर येत असेल तर या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका. शरीराची क्षमता लक्षात घ्या. थकवा जाणवल्यास ताबडतोब विश्रांती घ्या. योग्य काळजी घेतली तर नवरात्रोत्सवाचा आनंद सुरक्षितपणे आणि निरोगीपणे घेता येतो.

काय काळजी घ्याल?

मादक पदार्थांचे सेवन करू नका : जर तुम्ही गरजा किंवा दांडिया खेळायला जात असाल तर मादक पदार्थांचे सेवन करू नका, दारू, सिगारेट अशा मादक पदार्थांचे सेवन केल्यामुळे तुमच्या हृदयावर ताण पडतो आणि त्यामुळे हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता असते. त्यामुळे मादक पदार्थांचे सेवन करू नका.

व्यायाम करा : आपल्या शरीरासाठी नियमित व्यायाम करणे खूप गरजेचे आहे. व्यायाम केल्यामुळे आपले हृदय निरोगी राहण्यास मदत होते. तसेच शारीरिक तंदुरुस्तीदेखील महत्त्वाची आहे. हृदयविकाराच्या झटक्यापासून स्वतःचे संरक्षण करायचे असल्यास नियमित व्यायाम करा.

## 'कॅरी ऑन' म्हणजे शैक्षणिक दर्जा खालावण्याचा प्रकार : हायकोर्ट




■मुंबई। प्रतिनिधी:

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रथम वर्ष नापास झालेल्या विद्यार्थ्यांना तिसऱ्या वर्षात प्रोव्हिजनल प्रवेश देण्यास परवानगी दिल्याच्या परिपत्रकावर मुंबई उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. हा तंत्रज्ञानसमृद्ध पिढीचा शैक्षणिक दर्जा खालावण्याचा प्रकार आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. फेब्रुवारी २०२५ मध्ये महाराष्ट्र सरकारने नापास विद्यार्थ्यांसाठी लागू केलेल्या कॅरी ऑन धोरणावर न्या. रवींद्र घुगे आणि न्या. अश्विन भोबे यांच्या खंडपीठाने गंभीर प्रश्न उपस्थित केले असून, हे धोरण गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या दृष्टीने हितकारक नसल्याची टिप्पणी केली. परिपत्रकावर आधारित असलेल्या पुणे विद्यापीठाच्या निर्णयावरून न्यायालयाने सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंतर्गत येणाऱ्या सर्व बिगर-कृषी विद्यापीठांना नोटीस बजावली आहे.

न्यायालयाने काय म्हटले?

प्रथमदर्शनी, वाटते की पुणे विद्यापीठाचे हे परिपत्रक शिक्षणाचा दर्जा खालावणारे आहे. ही पिढी तंत्रज्ञान संपन्न आहे, ज्ञानाच्या स्त्रोतांपर्यंत सहज पोहोचू शकते आणि परीक्षेत चांगली कामगिरी करण्यासाठी आधुनिक साधनांचा उपयोग करू शकते, असे निरीक्षण २२ सप्टेंबर रोजी खंडपीठाने एका विधी विद्यार्थ्याच्या याचिकेवर सुनावणी घेताना नोंदविले. संबंधित विद्यार्थी एलएलबीच्या पहिल्या वर्षात नापास झाला.

## मुलुंड डम्पिंग ग्राउंडवर गोल्फ कोर्स की रुग्णालय उभारायचे?



■मुंबई। प्रतिनिधी:

मुलुंड डम्पिंग ग्राउंडवर कचरा टाकणे पूर्णपणे बंद झाले असून, तेथील मोकळ्या जागेचे नेमके काय करायचे, याबाबत निर्णय घेण्यापूर्वी मुंबई महापालिका या जागेचे सखोल पर्यावरणीय विश्लेषण करणार आहे. या विश्लेषणातून जागेची माती, भूजल, हवा आणि गॅस उत्सर्जन किती दूषित आहे, याची तपासणी केली जाईल. हा अहवाल आल्यानंतरच या २४ हेक्टर जागेच्या विकासाची अंतिम योजना ठरवली जाईल. त्यानंतरच या जागेवर गोल्फ कोर्स उभारायचे की रुग्णालय याबाबत निर्णय होणार आहे. जागेच्या तपासणीसाठी पालिका एका खासगी एजन्सीची मदत घेणार आहे. एजन्सी मातीची तपासणी करील. त्यात मातीतील ओलावा, सेंद्रिय घटक आणि कॅल्शिअम, निकेलसारखे एकूण ३९ घटक तपासले जातील. जमिनीखालील पाण्याची गुणवत्ता तपासली जाईल. यासाठी गढूळपणा, रंग, वास, पीएच पातळी तसेच शिसे, जस्त आणि ऍल्युमिनिअमचे प्रमाण तपासले जाईल. यासाठी ४८ घटक तपासले जातील.

भविष्यातील योजना काय आहेत?

या जागेवर विकास करण्याच्या अनेक कल्पना आहेत. स्थानिक भाजप आमदार मिहिर कोटेचा यांनी या जागेवर गोल्फ कोर्स बनवण्याचा प्रस्ताव दिला होता; तर, खासदार संजय पाटील यांनी रुग्णालय किंवा महाविद्यालय उभारण्याची सूचना केली आहे. पर्यावरण विश्लेषणाचा अहवाल आल्यानंतर, या जागेवर आरोग्य सुविधा द्यायची की मनोरंजनाचे ठिकाण बनवायचे, याबद्दल पालिका अंतिम निर्णय घेईल. हवेच्या गुणवत्तेचे निरीक्षण एकूण १५ घटकांवर केले जाईल. जागेतून बाहेर पडणाऱ्या गॅसमध्ये मिथेन, बेंझीन आणि इतर विषारी वायू किती प्रमाणात आहेत, हे तपासले जाईल. या संपूर्ण प्रक्रियेसाठी सुमारे तीन लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. एका आठवड्यात कामाचे अंतिम आदेश दिले जातील.

## विधवा, एकल महिलांना सरकारची भेट; मिशन वात्सल्य योजनेची व्याप्ती वाढवली

■मुंबई। प्रतिनिधी:

कोविडमुळे दोन्ही पालकांचे निधन झालेल्या अनाथ मुले व विधवा महिलांसाठी मिशन वात्सल्य योजना राबविण्यात येत आहे. या योजनेची व्याप्ती आता वाढविण्यात आली असून, यामध्ये सर्व विधवा, एकल व परित्यक्त्या महिलांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार त्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात येईल.

गरजू, अनाथ, बेवारस, सोडून दिलेल्या व शोषणाला बळी पडलेल्या मुलांचे संरक्षण, पुनर्वसन करणे, मुलांना सुरक्षित, पोषणयुक्त वातावरण, मूलभूत सेवा व शक्य असल्यास दत्तक व्यवस्था सुलभ करणे हा मिशन वात्सल्य योजनेचा उद्देश आहे. या योजनेत विधवा, एकल महिलांचा समावेश करून त्यांना योजनेचा लाभ मिळण्यासाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली समित्या स्थापन केल्या आहेत.

कठीण परिस्थितीत मुलांचे संरक्षण अन् शिक्षण, आरोग्य

> कठीण परिस्थितीत असलेल्या मुलांचे संरक्षण करणे.

> त्यांच्या काळजीसाठी बालसंगोपन संस्था, निरीक्षणगृह व बालगृहांची व्यवस्था.



> कायदेशीर दत्तक प्रक्रिया सुलभ करणे.

> शिक्षण, आरोग्य व मानसोपचार सेवा.

> गैर-संस्थात्मक मुलास दरमहा ४,००० रुपयांची मदत.

> संस्थेतून बाहेर पडलेल्या १८ वर्षांवरील मुलांनाही ४,००० रुपयांची मदत.

> अडचणीत असलेल्या मुलांना हेल्पलाइनद्वारे त्वरित मदत.

कुणासाठी मदत?

अनाथ, बेवारस, बालमजुरीतून मुक्त केलेली मुले, बाल तस्करी, लैंगिक शोषणातून वाचवलेली मुले यांना या योजनेतून मदत.

तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली समित्या अनाथ मुले, विधवा आणि एकल महिलांना लागू होणा[illegible]या शासकीय योजनांचा लाभ मिळवून देत आहेत.

## २०३० पर्यत मुंबई रेबिजमुक्त करणार; पालिकेचा संकल्प, जनजागृती करणार

■मुंबई। प्रतिनिधी:

मुंबई रेबिज निर्मूलन मोहीम हा मुंबई महापालिका आणि मिशन रेबिजच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेला महत्त्वाकांक्षी उपक्रम असून, २०३० पर्यंत हे शहर रेबिजमुक्त करण्याचा महापालिकेचा संकल्प आहे. या निमित्ताने जनजागृती मोहीम, आरोग्य, शिक्षण सत्रे आणि लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहेत. वर्ष २०२३ पासून आतापर्यंत १ लाखांहून अधिक श्वानांचे लसीकरण करण्यात आले आहे. लसीकरणासाठी जीपीएस ट्रॅकिंग व डब्ल्यूव्हीएस ऍपसारख्या डिजिटल साधनांचा वापर करण्यात येत आहे. महानगरपालिका क्षेत्रात या लसीकरण सुविधेसाठी



१६३ आरोग्य संस्थांमध्ये अँटी-रेबिज लसीकरण केंद्रे आहेत. रेबिजसंबंधी लसीकरण आणि उपचार सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. रेबिज आजारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्यास हा आजार पूर्णपणे, १०० टक्के टाळता येण्यासारखा आहे. दरवर्षी २८ सप्टेंबर रोजी वर्ल्ड रेबिज डे साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट रेबिजविषयी जागृती करणे आणि वन हेल्थ दृष्टिकोनातून या रोगाच्या नियंत्रणातील प्रगती अधोरेखित करणे, असे आहे.

> जखम साबण व स्वच्छ पाण्याने १५ मिनिटे धुवा

> हळद, तेल, चुना इत्यादी काहीही लावू नये.

> वैद्यकीय सल्ल्यानुसार अँटी-रेबिज लसीकरण पूर्ण करा.

> गंभीर चाव्याच्या घटनांमध्ये जवळच्या महानगरपालिका रुग्णालयातील आपत्कालीन उपचार विभागात दाखल करा.

> अपरिचित वा भटक्या प्राण्यांपासून दूर राहा.

> आपल्या पाळीव प्राण्यांना नियमितपणे लस द्या.

कस्तुरबा रुग्णालयात विशेष कक्ष स्थापन

रेबिज रुग्णांसाठी कस्तुरबा रुग्णालयात विशेष कक्ष उपलब्ध करून देण्यात आला आहे. वर्ष २०२४ मध्ये श्वानाने चावा घेतलेल्या नागरिकांची एकूण संख्या १ लाखपर्यंत आहे. या आकडेवारीत पुनरावृत्ती (डुप्लिकेशन) आणि मुंबई बाहेरील रुग्णांचा समावेश असून, त्यांचे साधारण प्रमाण १५ ते २० टक्के इतके आहे.

## 'म्हाडा'कडून मुंबईत १५०० घरे, तर राज्यात साडेअकरा हजार घरे!




■मुंबई। प्रतिनिधी:

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने (म्हाडा) चालू आर्थिक वर्षांत सामान्यांसाठी किती घरे उपलब्ध होतील, याचा आढावा घेतला असून त्यानुसार मुंबईत सामान्यांसाठी फक्त १४७४ घरे उपलब्ध होऊ शकणार आहेत. याशिवाय मुंबईत गिरणी कामगारांसाठी चार हजार २१५ घरांची निर्मिती होण्याची शक्यता आहे. त्याचवेळी राज्यात साडेअकरा हजार घरे उभारली जाणार आहेत. घरांच्या या बांधकाम प्रस्तावांना म्हाडाने मंजुरी दिली आहे. म्हाडाचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जायस्वाल यांनी राज्यात दोन लाख घरनिर्मितीचा संकल्प आखला आहे. त्यानुसार सध्या प्रयत्न सुरु असून झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवून त्या बदल्यात सामान्यांसाठी अधिकाधिक घरे निर्माण करण्याचेही म्हाडाचे ध्येय आहे. याशिवाय जुन्या इमारतींच्या पुनर्विकासातूनही काही हजार घरांची निर्मिती करण्याची योजना म्हाडाने आखली आहे. २०२५-२६ या कालावधीसाठी मंजूर करण्यात आलेल्या प्रस्तावांनुसार, मुंबईत अत्यल्प उत्पन्न गटासाठी १०९, अल्प गटासाठी ७८९, मध्यम गटासाठी ४३७ आणि उच्च गटासाठी १३९ अशा १४७४ घरांच्या बांधकामांना मंजुरी देण्यात आली आहे. याशिवाय ९८ संक्रमण शिबिरेही बांधण्यात येणार आहेत. रिक्त घरांची विक्री होत नसतानाही कोकण गृहनिर्माण मंडळाने या आर्थिक वर्षांत आणखी सात हजार ९५१ घरांच्या निर्मितीला मान्यता दिली आहे. यामध्ये अत्यल्प गटासाठी ३४६ तर अल्प गटासाठी सात हजार ३९९ आणि मध्यम गटासाठी २०६ घरांचा समावेश आहे. पुणे गृहनिर्माण मंडळाने अत्यल्प गटासाठी २२२ तर अल्प गटासाठी १३८ अशी १४८२ घरे उभारण्याचा निर्णय घेतला आहे. नाशिक गृहनिर्माण मंडळ फक्त ६४ घरांची तर छत्रपती संभाजी नगरात अत्यल्प गटासाठी १३४४ आणि अल्प गटासाठी १३८ घरे उभारली जाणार आहेत. अमरावतीत प्रामुख्याने भूखंड विक्रीवर म्हाडाने भर दिला आहे. त्यानुसार अत्यल्प गटासाठी ९५ तर अल्प गटासाठी १५४ मध्यम गटासाठी ३५२ भूखंड उपलब्ध करुन दिले आहेत. त्यातुलनेत फक्त ५४ सदनिकांची निर्मिती केली जाणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com